# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

**विषय:- भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलांची सेप्टीक टाकी सफाई कामी सक्शन वाहन व सिवर लाईन सफाईकामी जेटींग वाहन खरेदी करणेबाबत.**

**संदर्भ- १) शासन परिपत्रक क्र. राअस./मैला व्यवस्थापन नरीमन पॉईंट, मुंबई ४०००२१/११३९/२०२२ दि.३० नोव्हेंबर, २०२२**
**२) मा. उप-आयुक्त सो., (आरोग्य) यांचे मौखीक निर्देश.**

**<u>प्रस्तावना :-</u>**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये केंद्र शासनाने दि.०६ डिसेंबर २०१३ रोजी पासून हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन अधिनियम २०१३ लागू केला आहे. त्या अधिनियमातील अंतर्भूत मुद्दे तसेच संदर्भ क्र. १ नुसार सेप्टीक टँकची संख्या सुनिश्चित केल्यानंतर प्रतियषी शहरातील एकुण सेप्टीक टँक पैकी किमान ३३ टक्के सेप्टीक टँकचा उपसा केले जाईल अशा प्रकारे नियोजन करून सार्वजनिक स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य राखण्यासाठी निर्धारीत वेळापत्रकानुसार ३ वर्षातून किमान १ वेळा सेप्टीक टँक उपसा करणे गरजेचे आहे व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याने भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलांची सेप्टीक टाकी सफाई कामी सक्शन वाहन व सिवर लाईन सफाई कामी जेटींग वाहन खरेदी बाबतचा प्रस्ताव शौचालय व्यवस्थापन विभागामार्फत सादर करण्यात आला होता.

परंतु सदर वाहन खरेदी करणे बाबत शौचालय विभागातील लिपीक व अधिकारी यांना तांत्रिक बाबींची माहिती नसल्याने सदर वाहन खरेदी करणेची नस्ती वाहन विभागास प्राप्त झाली असता मा. उप आयुक्त सो (आरोग्य) यांच्या सोबत झालेल्या चर्चेनुसार OEM विक्रेत्यांकडे उपलब्ध असलेली ६ चाकी जेटींग व सक्शन वाहने खरेदी करणे कामी निर्देश दिले आहेत.

१) शासनाच्या GeM पोर्टल वर तपासले असता असे निर्देशनास येत आहे की, OEM विक्रेत्यांकडे उपलब्ध असलेले व Chassis Gross Vehicle Weight ७३००KG असेलेले सर्वात कमी दराचे सक्शन वाहन Product Id ५११६८७७-५७८७०५६६२६१ EGI--ELITE GREEN INDIA Diesel Medium Motor Vehicle Truck Mounted Suction Machine, TATA ७१०, Total Tank Capacity (sludge tank+water tank) ३५०० liter क्षमता रु. २४,५०,०००/- या दरामध्ये उपलब्ध आहे.

२) तसेच GeM पोर्टल वर तपासले असता असे निर्देशनास येत आहे की, OEM विक्रेत्यांकडे उपलब्ध असलेले व Chassis Gross Vehicle Weight ७४९० KG असलेले सर्वात कमी दराचे जेटींग वाहन Product Id: ५११६८७७-६०११०२९२६९४ Kishan Force Light Motor Vehicle Truck Chassis Mounted Jetting Machine वाहन Water Storage Tank Capacity ३००० Liter क्षमता असलेले रु.३१,२५,०००/- या दरामध्ये उपलब्ध आहे.

शासनाच्या GeM पोर्टल वरुन Vehicle Truck Mounted Suction Machine, Chassis Gross Vehicle Weight ७३००KG, Total Tank Capacity (sludge tank+water tank) ३५०० liter व Vehicle Truck Chassis Mounted Jetting Machine वाहन Chassis Gross Vehicle Weight ७४९० KG, Water Storage Tank Capacity ३००० Liter क्षमता असलेले खरेदी करणे कामी एकुण अंदाजे खर्च रु.५५,७५,०००/- मात्र अपेक्षित असुन त्यास मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांनी दि.२४/०८/२०२३ रोजी आर्थिक व प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.

**मागे पहा.**

भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलांची सेप्टीक टाकी सफाई कामी सक्शन वाहन व सिवर लाईन सफाईकामी जेटींग वाहन खरेदी कामीच्या प्रस्तावास मा.महासभेची मान्यता आवश्यक आहे. सद्या शासनाचे दिनांक १० जुन २०२२ च्या आदेशान्वये मा.आयुक्त यांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेले असल्याने मा.महासभेचे सर्व अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना प्राप्त झालेले आहे. या अधिकार कक्षे नुसार उपरोक्त प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांच्या धोरणात्मक निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

**प्रशासकीय ठराव क्रमांक :-** ५२५ **दिनांक :-** 04/10/2024

भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलांची सेप्टीक टाकी सफाई कामी सक्शन वाहन व सिवर लाईन सफाईकामी जेटींग वाहन खरेदी करणे आवश्यक असुन प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे शासनाच्या GeM पोर्टल वरुन Vehicle Truck Mounted Suction Machine, Chassis Gross Vehicle Weight ७३००KG, Total Tank Capacity (sludge tank+water tank) ३५०० liter व Vehicle Truck Chassis Mounted Jetting Machine वाहन Chassis Gross Vehicle Weight ७४९० KG, Water Storage Tank Capacity ३००० Liter क्षमता असलेले खरेदी करणे कामी एकुण अंदाजे खर्च रु.५५,७५,०००/- मात्र अपेक्षित आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५२ (अ) (१) नुसार दिनांक १० जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री. अजय वैद्य, प्रशासक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे भिवंडी निजापूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शौचायलांची सेप्टीक टाकी सफाई कामी सक्शन वाहन व सिवर लाईन सफाईकामी जेटींग वाहन खरेदी करणे कामी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**वरील प्रमाणे ठराव मंजुर**

**(अजय वैद्य)**
**प्रशासक**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**